क्र.मनपा/नसवि/२/ ०८ /२०१३-२०१४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका.
दिनांक :- ०६ / ०२ /२०१४

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०८ /२०१३-२०१४

## महानगरपालिका सर्वसाधारण सभेची नोटीस

मा. ______________________

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महानगरपालिका सभेचे कामकाज" मधील खंड १ (ह) व (आय) मध्ये केलेल्या तरतूदीनुसार सांगली,मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शनिवार दि.१५/०२/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठांतील विषय विचाराधीन आहेत. तरी, सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

## कार्यपत्रिका

१. मागील सर्वसाधारण सभा दि.२०/१२/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कर विभागाकडील कायम सेवक श्री.गौसमहंमद उस्मान कुरणे व.लिपिक यांना प्रमस्तिक संवहनी या आजाराच्या उपचारासाठी एकूण र.रु.३१,१४३/- मात्र वैद्यकिय खर्च आला असून, पैकी ९०% र.रु.२८,०२९/- मात्र वैद्यकिय परिपूर्तीची रक्कम आदा करणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे विषयपत्र.**

५. मा.महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र.जीईएन/१०९९/२५८/प्र.क्र.७०/९९/नवि.२४ दि.१२ जानेवारी २००२ अन्वये महानगरपालिकांना महापालिका कार्यक्षेत्रात नागरीकांना सोई-सुविधा पुरविणेसाठी येणारा खर्च भागविणे शक्य व्हावे यासाठी कराचे दर आणि शुल्कामध्ये सुधारणा करणेसाठी १५ सदस्यांची दरसुधार समिती मा.आयुक्तसो यांचे अध्यक्षतेखाली आणि मुख्य लेखाधिकारी हे नियंत्रणाखाली गठीत करणेस तसेच, सदर समितीमध्ये मा.महापौर,मा.उपमहापौर,मा.सभागृहनेता,मा.विरोधी पक्षनेता,उपायुक्त,सांगली व मिरज यांना सदस्यत्व देवून उर्वरित सदस्य तौलनिक संख्याबळानुसार दरसुधार समिती गठीत करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (लेखाविभाग) यांचे दि.२४/०१/२०१४ चे विषयपत्र.**

६. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियामक मंडळाच्या निवडणूकीसाठी संस्थेच्या नियमावली मधील नियम २(ए), (बी) आणि ६ अ नुसार तयार करणेत येणाऱ्या मतदार यादीसाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या तीन सदस्यांची नावे निश्चित करुन पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.१४/०१/२०१४ चे विषयपत्र.**

७. महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान हा आरोग्य विषयक कार्यक्रम सन २०१३-१४ या आर्थिक वर्षापासून राबविणे या कार्यक्रमासाठी ५०००० लोकसंख्येला एक याप्रमाणे १० यु.पी.एस.सी.व ०१ सी.एच.सी.स्थापन करणेबाबत प्रकल्पानुसार र.रु.११,४१,८२,६३०/- मात्र खर्चाचा पीआयपी प्राथमिक अहवाल तयार करुन सादर करणेत आला आहे. सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून ७५% खर्च व राज्य शासनाकडून २५% अनुदान प्राप्त होणार आहे. यासाठी महापालिका क्षेत्रामध्ये राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाचा प्रकल्प राबविणेसाठी मा.शासनाकडे ठराव पाठविणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२९/०१/२०१४ चे विषयपत्र.**

८. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून पुरविणेत येणारे फॉर्मस् आणि विविध व्यवसाय परवाना फी मध्ये सुधारणा करुन नविन आर्थिक वर्षापासनू आकारणी करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र.**

९. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे चौक व मुख्य रस्त्यांचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेतली असता, अशा स्वरुपाच्या कामगिऱ्या खाजगी व्यक्ती /संस्थांचे सहकार्य व त्यांचे स्वखर्चाने करुन घेणेकामी प्रशासनाने तयार केलेल्या शर्ती-अटीच्या मसुदयास तसेच, महासभेचे अधिकार प्रदान करणेस धोरणात्मक मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१०/०१/२०१४ चे विषयपत्र.**

१०. सांगली मिरज औद्योगिक क्षेत्र (मिरज ब्लॉक) विविध सुविधा पुरविणेकामी तयार करणेत आलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने एकूण र.रु.७४५.४९ लक्ष मात्र खर्चाच्या २५% रक्कम रु.१८६.३७ लक्ष इतका निधी महानगरपालिकेस जमा करावा लागणार आहे. यासाठी टप्प्या-टप्प्याने प्रत्येक वर्षी सर्वसाधारण रु.४६.६० लक्ष असे एकूण चार वर्षामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ विभाग सांगली यांचेकडे जमा करणेस धोरणात्मक मान्यता मिळणेसाठी तसेच,सन २०१३-१४ चे अर्थसंकल्पामध्ये ००५) इतर योजना, ०५१) ३) इतर योजना ४१२८३) निशांत कॉलनी स.नं.३४०/१ कूंपन घालणे या लेखाशिर्षाच्या जागी म.औ.वि.महामंडळाकडे भरणे असे लेखाशिर्ष निर्माण करुन चालू वर्षाची र.रु.४६,६०लक्ष इतकी तरतुद करणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१०/१२/२०१३ चे विषयपत्र.**

११. युआयडीएसएसएमटी सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड शहर पाणी पुरवठा योजना वारणा नदी उद्‌भवावरुन राबविणेकामी योजनेची किंमत र.रु.६९.८४ कोटी मात्रची योजना केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी, राज्य शासनाकडील सुजल निर्मल अभियान आणि राज्य शासनाकडील नगरोत्थान यापैकी एका पर्यायाची निवड करुन सदर कामांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किंवा खाजगी तज्ञ यंत्रणेकडून तयार करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास आणि सदरचा प्रकल्प अहवाल (DPR) मा.शासनाकडे मान्यतेसाठी सादर करणेस धोरणात्मक मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र.**

१२. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय मिरज कडील सौ.सावित्रीबाई फुले वाचनालय बालगंधर्व नाट्यगृहामधील आर्ट गॅलरी मध्ये स्थलांतरीत करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (ग्रंथपाल) यांचे विषयपत्र.**

१३. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडावी व इतर महानगरपालिके प्रमाणे शुल्क आकारणी व्हावी यासाठी महानगरपालिका क्षेत्रात उभारणेत येणारे होर्डिंग (जाहिरात फलक) यांचे सुधारीत दर निश्चित करुन नविन आर्थिक वर्षापासून आकारणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र.**

१४. महानगरपालिका क्षेत्रातील लहान दुकान गाळे,व्यापारी संकुलातील दुकान गाळे आणि खोकी हस्तांतरण करणेकामी महासभा ठराव क्र.१४२ दि.१९/१०/२००२ अन्वये हस्तांतरण फी निश्चित करणेत आली होती. त्यानुसार फी आकारणेत येत आहे. सदरची फी निश्चित करुन जवळ-जवळ ११ वर्षाचा कालावधी लोटला आहे. शुल्क वाढीच्या नैसर्गिक वाढीचा दर विचारात घेतला असता, महानगरपालिकेच्या उत्पन्ना मध्ये भर पडण्याच्या दृष्टीने गाळे हस्तांतरण करणेकामी सुधारीत दर निश्चित करुन नविन आर्थिक वर्षापासून आकारणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र.**

१५. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर जाहिरात प्रसिद्ध करणेकामी एकूण ८६ ठिकाणे निश्चित करणेत आलेली आहेत. सदर जागांवर जाहिरात प्रसिद्ध करणेकरीता एका जाहिरात बोर्डासाठी र.रु.६,९००/- इतके जागा भाडे आकारणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(क) अन्वये धोरणात्मक मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र.**

१६. महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय,कुपवाडचे कार्यक्षेत्रातील भुयारी गटर योजना कार्यान्वित करणेकामी सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन मा.शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणे.

१७. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०८/२०१३-१४

## महापालिका सभा दिनांक १५/०२/२०१४ करीता.

शनिवार दि.१५/०२/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २"महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. **मा.गौतम संभाजी पवार , यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील तीनही शहरामधील काही जागा भाड्याने देणेत आलेल्या आहेत याबाबत आज काय परिस्थिती आहे याची कल्पना व माहिती कोणा सदस्य व पदाधिकारी यांना माहिती नाही. सदर जागा किती कालावधीसाठी भाड्याने दिलेल्या आहेत? त्याचे भाडे काय? यापासून किती रुपयांचे उत्पन्न महापालिकेस प्राप्त झाले? याची माहिती महासभेस होणे आवश्यक आहे. ज्या जागा या अल्यल्प दराने भाड्याने दिल्या असल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. सदरकामी महासभेमध्ये सविस्तर चर्चा होवून धोरणात्मक होण आवश्यक आहे. सदरचा प्रस्ताव हा महापालिकेच्या आर्थिक हिताशी संबंधीत असलेने सविस्तर चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

२. **मा.गौतम संभाजी पवार , यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका शहरातील तीन ही शहरात अगदी मोक्याच्या ठिकाणी महानगरपालिकेच्या मालकीच्या अनेक मालमत्ता आहेत. ज्यांची किंमत आज बाजारभावामध्ये कोट्यावधी रुपये आहे. महानगरपालिका क्षेत्रातील अनेक मालमत्ता अद्यापही महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या नाहीत. सदर मालमत्तांवर महानगरपालिकेचे नाव नोंद करण्यात आले नसल्याने, त्यांचा गैरवापर होवून त्यावर अतिक्रमण होवून त्या महानगरपालिकेच्या ताब्यातून जाण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे कोटयावधी रुपये नुकसान होणार आहे. सदर मालमत्तांचे संरक्षण व जतन करण्याबाबत यापूर्वीच्या धोरणात काळानुरुप आवश्यक ते बदल करणे, मालमत्ता शोधून काढणे या संदर्भातील सर्व कायदेशिर बाबींची पूर्तता विहित मुदतीत करणे अत्यंत गरजेचे आहे आणि ही जबाबदारी सर्वस्वी महानगरपालिका प्रशासनाची आहे. महानगरपालिकेचे हित जपण्यासाठी या विषयावर साधक-बाधक चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. सदरचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या आर्थिक हिताशी निकडीत असलेने सविस्तर चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

---

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : ११/०२/२०१४.

**महापालिका सचिव,**
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २६०

विषय क्रमांक :- ०१

---

मागील सर्वसाधारण महासभा दि.२०/१२/२०१३ चे कार्यवृत्तातील ठराव क्र.२३२ ते ठराव क्र.२५९ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नगरसचिव

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २६१

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

साहित्यीक,महाकवी, दलित पँथर संघटनेचे संस्थापक,पद्मश्री नामदेव ढसाळ यांचे मुंबई येथे नुकतेच निधन झाले. यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

अनुमोदक :- मा.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ कांचन ३ कें. बळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २६२

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

ज्येष्ठ पत्रकार व स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षात निरपेक्षपणाने पक्ष कार्य व पत्रकारीता एकनिष्ठपणे करणारे मा.गजाननराव हुद्दार यांचे दि.०४ फेब्रुवारी २०१४ रोजी दु:खद निधन झाले. यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.स्वरदा श्रीरंग केळकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

श्री कांचन उकांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २६३

विषय क्रमांक :- ०२

## दुःखवटा ठराव

मिरज वैद्यकिय क्षेत्रातील ज्येष्ठ धन्वंतरी डॉ.केशव रामचंद्र प्राणी यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. यांच्या दुःखद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दुःखात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.विजय वसंत घाडगे

सौ. कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २६४

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

मिरज येथील ज्येष्ठ समाज सेवक आणि भ्रष्टाचार निर्मुलन मधील कार्यकर्ते श्री.नबीसो मुलाणी यांचे दि.०५/०१/२०१४ रोजी निधन झाले. यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.अतहर इद्रिस नायकवडी

अनुमोदक :- मा.आयेशा इद्रिस नायकवडी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २६५

विषय क्रमांक :- ०२

## दुःखवटा ठराव

मिरज येथील ज्येष्ठ समाजीक कार्यकर्ते श्री.ताजपीर आगा यांचे दि.१४/०२/२०१४ रोजी निधन झाले. यांच्या दुःखद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दुःखात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.अतहर इद्रिस नायकवडी

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.आयेशा इद्रिस नायकवडी

श्री.कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २६६

विषय क्रमांक :- ०२

---

## दु:खवठा ठराव

फुले,शाहू,आंबेडकर,साठे चळवळीतील सामाजिक कार्यकर्त्या सुनितताई मल्हारी वाघमारे यांचे आकस्मित निधन झाले. यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.शेवंताताई गोपाळ वाघमारे

अनुमोदक :- मा.सुरेखा कल्लाप्पा कांबळे

ठराव सर्वानुमते मंजुर

कांचन कांबळे

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २६७

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यातील जैन समाजाला अल्पसंख्यांकाचा दर्जा मध्ये समाविष्ठ केलेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा महाराष्ट्र शासनाचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.प्रशांत विजयकुमार पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.प्रदीप जगोंडा पाटील

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २६८

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

महानगरपालिका क्षेत्रातील व आसपासच्या नागरिकांची माधवनगर येथे बसस्थानक व्हावे अशी जुनी मागणी असलेली माधवनगर येथे बसस्थानकासाठी नेते मा.ना.पतंगरावजी कदम वनमंत्री, मा.ना.मदनभाऊ पाटील अध्यक्ष उर्वरित महाराष्ट्र वैद्यानिक विकास महामंडळ, मा.महापौर, सौ.कांचन कांबळे, नगरसेवक मा.शेखर माने यांनी अध्यक्ष एस.टी.महामंडळ व महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा व अथक प्रयत्न करुन माधवनगर बसस्थानकास मंजूरी मिळवून कान मार्गी लावल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा सर्वांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.विजय वसंत घाडगे

अनुमोदक :- मा.गजानन रामू मगदुम

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन.ऽ.कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २६९

विषय क्रमांक :- ०२

---

## अभिनंदनाचा ठराव

सांगलीवाडी येथील अन्यायी टोल वसुली विरोधात लढा उभा करुन सर्व राजकीय पक्षांना व विविध सामाजिक संघटनांना एकत्रित करुन जनतेच्या होणाऱ्या टोलरुपी जिझीया करातून मुक्तता करण्यासाठी आपला पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून सर्वांना संघटीत करुन १५ दिवस व रात्र खडा पहारा देत अन्यायी टोल वसंली बंद करणेसाठी झटणाऱ्या उपमहापौर प्रशांत पाटील ऊर्फ पप्पू मजलेकर व त्यांना समर्थ साथ देण्यासाठी मा.महापौर सौ.कांचन कांबळे यांनी सुध्दा आपल्या सहकारी नगरसेविकासह टोल वसुली विरोधीतील अंदोलनात "हम भी कुच कम नही" असे ठणकावत सक्रीय सहभाग दिला १५ दिवसाच्या आंबट-गोड घटनातून कोणताही कडवटपणा येवून न देता महात्मा गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहाची आठवण ताजी करणाऱ्या अहिंसक मार्गाने लढा यशस्वी केला व जाचक टोलच्या जोकंडातून मुक्तता मिळवून दिली. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.महापौर सौ.कांचन कांबळे, उपमहापौर प्रशांत पाटील (मजलेकर) त्यांचे सहकारी तसेच, सर्व राजकीय पक्षांचे नेते,कार्यकर्ते विविध संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच, अंदोलनाला पाठींबा देणाऱ्या सामान्य जनतेचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.मृणाल चेतन पाटील

अनुमोदक :- मा.निर्मला राजेंद्र जगदाळे

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही) कांचन उ कांबळे

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २७०

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष निवडीमध्ये युवा नेते मा.विश्वजीत (बाळासाहेब) कदम यांची मराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष या पदी बहुमताने फेर निवड करण्यात आली. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.विश्वजीत (बाळासाहेब) कदम यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.विजय वसंत घाडगे

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २७१

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

क्रांतिवीर भगवानराव पाटील बप्पा यांच्या स्मृती दिनानिमित्ताने देण्यात येणारा क्रांतिवीर भगवानराव बप्पा पाटील सामाजिक पुरस्कार यावर्षी माजी आमदार मा.प्रा.शरद पाटील यांना जाहिर करण्यात आला. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा माजी आमदार मा.प्रा.शरद पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.विजय वसंत घाडगे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन ३ कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २७२

विषय क्रमांक :- ०२

---

# अभिनंदनाचा ठराव

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या विधान सभा क्षेत्र निवडीमध्ये युवा नेते मा.मंगेश चव्हाण यांची विधान सभा क्षेत्र युवक काँग्रेसच्या अध्यक्ष पदी बहुमताने निवड करण्यात आली. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.मंगेश चव्हाण यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.विजय वसंत घाडगे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २७३

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

नुकत्याच पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र शासनाचा क्रिडा पुरस्कार प्रदान सोहळ्यामध्ये मिरजेचे अंबाबाई तालीम संस्थांनचे अध्यक्ष मा.संजय भोकरे यांना उत्कृष्ठ क्रिडा संघटक म्हणून शिवछत्रपती क्रिडा संघटक पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.संजय भोकरे यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.प्रदिप जगोंडा पाटील

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २५४

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

ऑल इंडिया पिकल बॉल असो.तर्फे झालेल्या स्पर्धेमध्ये सांगली येथील नॅशनल चॅपियन कुमारी प्रतिक्षा बावडेकर यांनी सुवर्ण पदक मिळविल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा कुमारी प्रतिक्षा बावडेकर यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

अनुमोदक :- मा.अश्विनी हेमंत खंडागळे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २७५

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

नुकत्याच पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र शासनाचा क्रिडा पुरस्कार प्रदान सोहळ्यामध्ये वेटलिफ्टींग या क्रिडा प्रकारामध्ये श्री.मयुर किरण सिंहासने यांना उत्कृष्ठ खेळाडू म्हणून शिवछत्रपती क्रिडा पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.मयुर किरण सिंहासने यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.प्रदिप जगोंडा पाटील

श्री कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** | दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २७६

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

अ‍ॅथलॅस्टीक मध्ये महाराष्ट्र शासनाच्या क्रिडा क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा शिवछत्रपती राज्य पुरस्कार (सन २०१०-२०११ चा) सांगली येथील सौ.रेश्मा सुहास होनमाने यांना प्रदान करण्यात आला. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा सौ.रेश्मा सुहास होनमाने यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.गौतम संभाजी पवार

अनुमोदक :- मा.शिवराज श्रीशैल्य बोळाज

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ कांचन उ कांबळे

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २७७

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर यांच्याकडून उत्कृष्ठ उद्योजक पुरस्कार सौ.काव्यश्री शरद नलवडे यांना मिळाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा सौ.काव्यश्री शरद नलवडे यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.गौतम संभाजी पवार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे

कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २७८

विषय क्रमांक :- ०४

---

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कर विभागाचे आस्थापनेवर वरिष्ठ लिपीक या पदावर श्री.गौसमहंमद उस्मान कुरणे हे कायमपणे कार्यरत आहेत. त्यांना प्रमस्तिक संवहनी हा आजार झाल्याने, त्यांनी मिरज येथील खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेतले आहेत. सदर आजाराच्या उपचारासाठी एकूण र.रु.३१,१४३/- मात्र वैद्यकिय खर्च आला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६ (१८) अन्वये महानगरपालिका कर्मचारी किंवा त्यांच्या कोणत्याही वर्गाच्या कल्याणासाठी अन्य कोणत्याही उपाययोजना करणे ही बाब महानगरपालिकेच्या अधिन आहे. तसेच, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एम.एम.जी.१०९५/व्हीआर-४५/९५/आरोग्य-३ दि.०४/०७/२००० मधील खाजगी रुग्णाल्यात घेतलेल्या औषधोपचाराची वैद्यकीय परिपुर्ती रक्कम अनुज्ञेय असून, सदर आजाराची नोंद शासन निर्णयात आहे. त्यास अनुसरुन श्री.कुरणे यांनी वैद्यकीय परिपुर्तीची रक्कम मागणी केली आहे. औषधोपचारासाठी एकूण आलेल्या र.रु.३१,१४३/- पैकी ९०% र.रु.२८,०२९/- मात्र वैद्यकिय परिपूर्तीची रक्कम श्री.कुरणे आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.कि.का.जामदार

अनुमोदक :- मा.राजेश नाईक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासन अधिकारी
(आस्थापना)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २७९

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (लेखाविभाग) यांचे दि.२४/०१/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र.जीईएन/१०९९/२५८/प्र.क्र.७०/९९/नवि.-२४ दि.१२ जानेवारी २००२ अन्वये महानगरपालिकांना महापालिका कार्यक्षेत्रात नागरीकांना सोई-सुविधा पुरविणेसाठी येणारा खर्च भागविणे शक्य व्हावे यासाठी कराचे दर आणि शुल्कामध्ये सुधारणा करणेसाठी १५ सदस्यांची दरसुधार समिती मा.आयुक्तसो यांचे अध्यक्षतेखाली आणि मुख्य लेखाधिकारी हे नियंत्रणाखाली गठीत करणेबाबत शासन निर्णय आहेत. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या दर सुधार समितीमध्ये तौलनिक संख्याबळानुसार खालील सदस्यांची दरसुधार समिती गठीत करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. मा.आयुक्तसो | :- | पदसिद्ध अध्यक्ष |
| २. मा.सौ.कांचन युवराज कांबळे | :- | सदस्य |
| ३. मा.किशोर दादासो जामदार | :- | सदस्य |
| ४. मा.प्रशांत विजयकुमार पाटील | :- | सदस्य |
| ५. मा.राजेश विठ्ठल नाईक | :- | सदस्य |
| ६. मा.शिवाजी बाबूराव दुर्वे | :- | सदस्य |
| ७. मा.निरंजन सुरेश आवटी | :- | सदस्य |
| ८. मा.हारुण अजीज शिकलगार | :- | सदस्य |
| ९. मा.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान | :- | सदस्य |
| १०. मा.विष्णू आण्णासाहेब माने | :- | सदस्य |
| ११. मा.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी | :- | सदस्य |
| १२. मा.आशा नितीन शिंदे | :- | सदस्य |
| १३. मा.जगन्नाथ बापू ठोकळे | :- | सदस्य |
| १४. मा.सौ.शांता रघुनाथ जाधव | :- | सदस्य |
| १५. मा.मुख्यलेखाधिकारी | :- | सचिव |

वरील प्रमाणे गठीत केलेल्या दरसुधारसमितीचे पदसिद्ध सचिव म्हणून मुख्यलेखाधिकारी यांनी काम पहाणेचे असून, संबंधीत सदस्यांना नियुक्तीची पत्रे देणेत यावीत.

उक्त विषयाच्या अनुषंगाने प्राप्त झालेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड या तिन्ही नगरपरिषदांची मिळून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका दि.०९ फेब्रुवारी १९९८ रोजी अस्तित्वात आली. महाराष्ट्र शासनाने अविकसीत भागाचा विकास व्हावा यासाठी महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ अंमलात आणला आहे. सदर अधिनियमातील तरतुदी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने लागू करुन घेवून महापालिका क्षेत्रातील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेस वेळोवेळी मुदतवाढ दिली आहे. महानगरपालिका अस्तित्वात येवून जवळ-जवळ १५ वर्षाचा कालावधी लोटला आहे. सदर कालावधीत महापालिका क्षेत्रामध्ये विस्तारीत भाग मोठ्या प्रमाणात झालेला असून, विस्तारीत भागातील नागरीकांना सोईसुविधा पुरविणेसाठी गुंठेवारी समितीची नियुक्ती करणे या सभेस उचित वाटते. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार खालील प्रमाणे गुंठेवारी समिती गठीत करणेत येत आहे.

१. मा.विजय वसंत घाडगे
२. मा.शकुंतला दत्तात्रय भोसले
३. मा.प्रशांत पायगोंडा पाटील
४. मा.दिलीप तुकाराम पाटील
५. मा.सुरेश देवाप्पा आवटी
६. मा.बबीता संजय मेंढे
७. मा.सुरेखा कल्लापा कांबळे
८. मा.गुलजार अल्लाबक्ष पेंढारी
९. मा.शालन मारुती चव्हाण
१०. मा.धनपाल तात्या खोत
११. मा.राजू लक्ष्मण गवळी
१२. मा.जुबेर इब्राहिम चौधरी
१३. मा.प्रियांका सुरेश बंडगर
१४. मा.शेडजी सुबराव मोहिते
१५. मा.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे
१६. मा.संगिता विठ्ठल खोत

सूचक :- मा. किशोर दादासो आमदार.

अनुमोदक :- मा. बसवेश्वर आनंदराव सातपुते.

ठराव सर्वानुमते मंजुर

कांचन ऽ कांबळे
महापौर,

१) मुख्य लेखाधिकारी
२) सहा. संचालक नगररचना

वरील निर्णयानुसार सभा सदस्यांना नियुक्तीपत्रे देऊन, योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २८०

विषय क्रमांक :- ०६

---

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.१४/०१/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियामक मंडळाच्या निवडणूकीसाठी संस्थेच्या नियमावली मधील नियम २(ए), (बी) आणि ६ अ नुसार तयार करणेत येणाऱ्या मतदार यादीसाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या खालील तीन सदस्यांची नावे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था,पुणे यांचेकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

१. मा.मेंढे संजय नायकू
२. मा.पाटील संतोष शिवदास
३. मा.माने विष्णू आण्णासाहेब

सूचक :- मा. कि. दा. जमदार

अनुमोदक :- मा. ब. आ. सातपुते.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नगरसचिव विभाग

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८

दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २८९

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२९/०१/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.आयुक्त तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियान यांचे मार्गदर्शक सुचनांनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान हा आरोग्य विषयक कार्यक्रम सन २०१३-१४ या आर्थिक वर्षापासून राबविणेत येत आहे. या कार्यक्रमासाठी पायाभूत सुविधा बळकट करणेसाठी कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून ७५% खर्च व राज्य शासनाकडून २५% अनुदान प्राप्त होणार आहे. शासनाच्या निर्देशानुसार महापालिका क्षेत्रात ५०००० लोकसंख्येला एक याप्रमाणे १० यु.पी.एस.सी.व ०१ सी.एच.सी.स्थापन करणेबाबत मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने प्रकल्प अहवालानुसार र.रु.११,४१,८२,६३०/- मात्र खर्चाचा पीआयपी प्राथमिक अहवाल मा.शासनाकडे सादर केलेला आहे. सदर प्रकल्प अहवालास शासनाकडून लवकरात लवकर मान्यता मिळणेसाठी महासभेच्या ठरावाची आवश्यकता आहे. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान राबविणेकामी प्रकल्प अहवाल मा.शासनाकडे सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. तसेच, मा.आयुक्त तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे निर्देशानुसार पीआयपी अहवाल आणि शासन निर्देशाप्रमाणे एम.ओ.यु.अहवाल वेळोवेळी बिनचूकपणे सादर करणेत यावा त्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. कि.दा. जमदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- S. M. Chavan
मा. श्री. म. चव्हाण

महापौर,

वैद्यकीय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २८२

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड या तिन्ही नगरपरिषदांची मिळून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सन १९९८ मध्ये अस्तित्वात आली. महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील विविध शुल्कामध्ये आकारणी करणेबाबत महासभा ठराव क्र.१२८ दि.१९/०९/२००० अन्वये सुधारीत दरांना मान्यता देणेत आली होती. त्यानुसार महापालिका क्षेत्रातील विविध व्यवसायधारकांचेकडून शुल्क आकारणेत येते. महानगरपालिकेचे जकात हे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत होते. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यातील ड वर्ग महानगरपालिकांची जकात कर रद्द करुन त्याऐवजी स्थानिक संस्थाकर आकारणी मे २०१३ पासून अंमलात आली आहे. त्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती दोलायमान झाली असून, महानगरपालिकेस अन्य विभागाकडून येणारे उत्पन्न अत्यल्प असल्याने आणि सदरची शुल्क सुधारणा करुन जवळ-जवळ १५ वर्षाचा कालावधी लोटला आहे. त्यामुळे बाजारातील भाववाढ विचारात घेता उत्पन्न वाढीच्या दृष्टीने दरामध्ये सुधारणा करणे या सभेस उचित वाटते. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील पुरविणेत येणारे फॉर्मस् आणि विविध व्यवसाय परवान्यामध्ये खालील प्रमाणे सुधारीत दरास मान्यता देत आहे.

| अ. क्र. | घटक | सद्याचे शुल्क | प्रस्तावित शुल्क | महासभेने मान्यता दिलेले शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | एन.ओ.सी.फॉर्म फी<br>(N.O.C. From Fee) | २/- | १००/- | १००/- |
| २. | लायसन्स फॉर्म फी<br>(Licence From Fee) | २/- | १००/- | १००/- |
| ३. | लायसन्स नुतनीकरण फॉर्म फी<br>(Licence Reneiwation From Fee) | २/- | १००/- | १००/- |
| ४. | आरोग्य विभागामार्फत देण्यात येणारे ना-हरकत दाखले | - | १००/- | १००/- |

| अ.क्र. | व्यवसायाचे नाव | सद्याचे शुल्क (रु.) मा.महासभा ठराव क्र.१२८ दि.१९/०९/२००० | प्रस्तावित शुल्क (दरवर्षी १०% नैसर्गिक वाढ लक्षात घेवून) | महासभेने मान्यता दिलेले शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | वायुमिश्रीत पेय | ५०/- | २००/- | ४००/- |
| २. | हाडे | ५०/- | २००/- | ४००/- |
| ३. | विटा किंवा कौले | १००/- | ४००/- | ४००/- |
| ४. | जनावरांच्या आतड्यापासून तयार केलेली तार | ५०/- | २००/- | ४००/- |
| ५. | कापूस किंवा खराब कापूस किंवा सर्की | ५०/- | २००/- | ३००/- |
| ६. | दाबलेला दगडी कोळसा | १००/- | ४००/- | ५००/- |
| ७. | डांबर | १००/- | ४००/- | १०००/- |
| ८. | डायनामाईट | १००/- | ४००/- | १०००/- |
| ९. | चरबी | १००/- | ४००/- | १०००/- |
| १०. | दारु काम | १००/- | ४००/- | १०००/- |

... २ ...

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११. | बर्फ,आईस कँण्डी, आईस् फ्रुट किंवा आईस्क्रिम | १००/- | ४००/- | १०००/- |
| १२. | चुना | १००/- | ४००/- | ५००/- |
| १३. | आगपेट्या | १००/- | ४००/- | ५००/- |
| १४. | कागद | १००/- | ४००/- | १०००/- |
| १५. | रबरी माल | ५०/- | २००/- | ५००/- |
| १६. | तपकीर | ५०/- | २००/- | ५००/- |
| १७. | साबण | १००/- | ४००/- | ४००/- |
| १८. | साबण खडीसाखर | ३००/- | १२००/- | १२००/- |
| १९. | टार | १००/- | ४००/- | ५००/- |
| २०. | वनस्पती तेल | १००/- | ४००/- | १०००/- |
| २१. | शाबुदाण्याचा कारखाना | १००/- | ४००/- | १०००/- |
| २२. | आसवणी म्हणून | २००/- | ८००/- | ८००/- |
| २३. | लाखकिंवा लाखेच्या कांड्या यांच्या निर्मितीसाठी | १००/- | ४००/- | १०००/- |
| २४. | लाद्यांच्या निर्मितीसाठी | १००/- | ४००/- | ४००/- |
| २५. | सिरप तयार करण्यासाठी | ५०/- | २००/- | २००/- |
| २६. | नवसागर निर्मितीसाठी | १००/- | ४००/- | १०००/- |
| २७. | क्लोरेट मिक्सरच्या निर्मितीसाठी | १००/- | ४००/- | १०००/- |
| २८. | विस्फोटक पारद निर्मितीसाठी | १००/- | ४००/- | १०००/- |
| २९. | नायट्रो कंपौंड निर्मितीसाठी | १००/- | ४००/- | १०००/- |
| ३०. | गॅस निर्मितीसाठी | २००/- | ८००/- | १०००/- |
| ३१. | शिंगाच्या निर्मितीसाठी | ५०/- | २००/- | २००/- |
| ३२. | आंबाडे निर्मितीसाठी | ५०/- | २००/- | २००/- |
| ३३. | सण निर्मितीसाठी | ५०/- | २००/- | २००/- |
| ३४. | राळ निर्मितीसाठी | १००/- | ४००/- | ४००/- |
| ३५. | रंग निर्मितीसाठी | १००/- | ४००/- | १०००/- |
| ३६. | यंत्रमाग (प्रत्येक यंत्रमागासाठी) | १००/- | ४००/- | ५००/- |
| ३७. | धोबी घाट | १००/- | ४००/- | ४००/- |
| ३८. | साळी उकळण्यासाठी | १००/- | ४००/- | ४००/- |
| ३९. | भात गिरणी म्हणून | १००/- | ४००/- | ४००/- |
| ४०. | कुरमुरे तयार करण्यासाठी | १००/- | ४००/- | ५००/- |
| ४१. | ५ अश्वशक्तीसाठी | २००/- | ८००/- | २०००/- |
| | ६ ते १० अश्वशक्तीसाठी | ३००/- | १२००/- | २५००/- |
| | ११ ते १०० अश्वशक्तीसाठी | ४००/- | १५००/- | ३०००/- |
| | १०१ ते १५० अश्वशक्तीसाठी | १५००/- | ५७००/- | १००००/- |
| | १५१ ते २५० अश्वशक्तीसाठी | ३०००/- | ११५००/- | १५०००/- |
| | २५१ ते ४५० अश्वशक्तीसाठी | ४०००/- | १५२००/- | २००००/- |
| | ४५१ च्या पुढे दर १० अश्वशक्तीच्या भागास रु.५०/- ने वाढ | ५०००/- | १९०००/- | २५०००/- |

वरील प्रमाणे प्रशासनाने सदर सुधारीत दराची नोंद घेवून सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापासून आकारणी करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. कि. दा. जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- मा. राजेश नाईक

वैद्यकीय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २८३

विषय क्रमांक :- ०९

---

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१०/०१/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे चौक व मुख्य रस्त्यांचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महानगरपालिका क्षेत्रातील जकात कर रद्द करुन त्याऐवजी स्थानिक संस्था कराची आकारणेचे निर्देश आहेत. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात सद्या स्थानिक संस्था कर आकारणी केली जाते. महानगरपालिकेच्या इतर विभागाकडून येणारे उत्पन्न विचारात घेतले असता,सदरचे उत्पन्न अत्यल्प स्वरुपाचे आहे. त्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता, अशा स्वरुपाच्या कामगिरी महानगरपालिका निधीतून शक्य होणार नाही. महापालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे चौक व मुख्य रस्ते लोकसहभागातून सुशोभिकरण केलेस शहराच्या सौंदर्यामध्ये भर पडणार आहे. ही बाब विचारात घेवून महापालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे चौक व मुख्य रस्ते खाजगी व्यक्ती /संस्थांचे सहकार्य व त्यांचे स्वखर्चाने करुन घेणेकामी प्रशासनाने तयार केलेल्या शर्ती-अटीच्या मसुदयास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. महापालिका क्षेत्रातील चौक व मुख्य रस्ते सुशोभिकरणासाठी संस्था / खाजगी व्यक्ती यांचेकडून मागणी आलेस याकामी महासभेची मान्यता होवून प्रस्तावित कामगिरी करणेस दिनावधी लागणार आहे. ही बाब विचारात घेवून अशा स्वरुपाची मागणी आलेस मान्यता देणेकामी संबंधीत व्यक्ती /संस्था यांना मान्यता देणेकामी मा.महापौर,मा.उपमहापौर आणि मा.आयुक्तसो यांना ही सभा प्राधिकृत करीत आहे.

सूचक :- मा.कि.दा.जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. राजेंद्र नाईक

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २८४

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१०/१२/२०१३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज एम.आय.डी.सी.मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशसनने मा.मंत्री (उद्योग) महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना सदर भागामध्ये विविध सुविधा पुरविणेची मागणी केली आहे. त्यास अनुसरुन मा.मंत्री महोदयांनी औद्योगिक क्षेत्रास भेट देवून बैठक घेवून सदर क्षेत्रामध्ये मुलभूत सोयी सुविधा पुरविणेसाठी त्वरीत प्रस्ताव देणेबाबत सूचना दिल्या. तसेच, मा.जिल्हाधिकारीसो यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा अद्योग मित्र/समितीच्या बैठकीमध्ये २५% रक्कम सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका २५% रक्कम जिल्हा नियोजन समिती, २५% रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि उर्वरित २५% रक्कम ही या क्षेत्रातील उद्योजकांचेकडून सेवा शुल्काच्या माध्यमातून वसूल करुन मिरज औद्योगिक क्षेत्रातील रस्ते दुरुस्ती,डांबरीकरण व पथदिवे ही प्रस्तावित कामे दोन टप्प्यात करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पुणे यांचेकडे प्रस्तावित केले आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मिरज एम.आय.डी.सी. /मिरज ब्लॉक यांचेशी झाले चर्चेनुसार २५% नुसार महानगरपालिकेचा अभिप्राय तातडीने देणेबाबत कळविले आहे. सदरची बाब ही धोरणात्मक असल्याने, त्यास महासभेची मान्यता आवश्यक आहे.

अध्यक्ष, सांगली मिरज एम.आय.डी.सी.मॅन्युफॅक्चरर्स असो.सांगली यांनी (१) खराब रस्त्याची दुरुस्ती करुन ७५ मी.मी.सेमीग्राउट व २० मी.मी.ए.सी.पद्धतीने डांगरीकरण करणे व कमी खराब रस्ते खड्डे भरुन ए.सी. पद्धतीने डांबरीकरण करणे एस्टीमेट र.रु.६१२.९१ लक्ष, (२) मिरज ए.आय.डी.सी.क्षेत्रातील सर्व स्ट्रीट लाईट बसविणे एस्टीमेट र.रु.१३२.५८ लक्ष असे एकूण र.रु.७४५.४९ लक्ष कामांच्या निविदेचा तपशील दि.२७/०८/२०१३ चे पत्राने कळविलेला आहे. त्यानुसार महानगरपालिकेस एकूण खर्चाच्या रक्कमेपैकी २५% रक्कम रु.१८६.३७ लक्ष इतकी रक्कम भरावी लागणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मे.२०१३ पासून जकात करा ऐवजी स्थानिक संस्था कर लागू करणेत आलेला आहे. महानगरपालिकेचे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत बंद झाल्याने आणि स्थानिक संस्था करास असलेला व्यापाऱ्यांचा विरोध याचा परिणाम होवून महापालिकेच्या उत्पन्न कमी झाले आहे. त्यामुळे महापालिका क्षेत्रातील विकास कामे ठप्प झाली असून, सदर प्रस्तावाचे कामी २५% निधी एक रक्कमी भरणे शक्य होणार नाही अशी वस्तुस्थिती आहे.

... २ ...

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेतली असता, मा.जिल्हाधिकारीसो,सांगली यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार एकूण र.रु.७४५.४९ लक्ष मात्रच्या प्रस्तावित कामांच्या २५% र.रु.१८६.३७ लक्ष इतका निधी टप्प्या-टप्प्याने प्रत्येक वर्षी सर्वसाधारण रु.४६.६० लक्ष याप्रमाणे एकूण ४ हप्त्यामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सांगली यांचेकडे जमा करणेस तसचे, प्रस्तावित कामी रक्कम भरणेसाठी अर्थसंकल्पामध्ये मिरज एम.आय.डी.सी.(मिरज ब्लॉक) मधील विविध सुविधा पुरविणेकामी तयार करणेत आलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने २५% महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे भरणे असे लेखाशिर्ष निर्माण करुन सदर खात्यामध्ये चालू वर्षी र.रु.४६,६०लक्ष इतकी तरतुद करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा धोरणात्मक मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २८५

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

UIDSSMT अंतर्गत प्रगतीपथावरील सुधारीत व विस्तारीत सांगली-कुपवाड नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामांचे प्रगती आढावा बैठक घेणेत आली होती. सदर बैठकीस महापालिकेचे पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीत कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी कामांचे प्रगती बाबत माहिती सादर केली. तद्नंतर कृष्णा नदी येथूनच उद्भव देवुन योजना कार्यान्वित केली असल्याने मिळणा-या पाण्याबद्दल नागरिकांचे मोठया प्रमाणावर तक्रारी असून, मुळ मंजुर योजनेप्रमाणे सांगली, कुपवाड शहरातील नागरिकांना वारणा नदीतील प्रदुषण विरहित शुध्द, चविने गोड असे पाणी मिळणार होते, परंतु पुनः सांगली येथील कृष्णा नदीचे पाणी शहरवाशी यांना पिणेस भाग पडत असल्यामुळे मुळ योजनेत प्रस्तावित वारणा नदी या उद्भवावरुनच योजना कार्यान्वित करणेचे गरजेचे आहे. तरी मुळ प्रस्तावातुन वारणा उद्भव संबंधी पूर्वी वगळणेत आलेल्या सर्व कामांचा समावेश करुन वारणा नदी समडोळी गावापासुनच योजना आखणे व कार्यान्वित करणे आवश्यक आहे, यासाठी तातडीने मुळ योजनेतील उर्वरीत सर्व कामांचे समावेश करुन योजनेचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी तातडीने सादर करणेबाबत सूचित केले.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे ठराव क्र. ५० दिनांक ०३/०७/२००६ नुसार केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी कार्यक्रमांतर्गत सप्टेंबर २००६ मध्ये रु. ७९.०२ कोटी किंमतीच्या सुधारीत व विस्तारीत सांगली कुपवाड शहर पाणी पुरवठा योजना (वारणा उद्भव ) योजनेला प्रशासकीय मंजुरी मिळाली होती. सन २००५-०६ च्या दरसूचीनुसार या योजनेची मंजुर किंमत रु. ७९.०२ कोटी इतकी होती. मंजुर योजनेचा तपशिल खालीलप्रमाणे ....

| अ.क्र. | तपशिल | मंजुर आर्थिक आकृतीबंध |
|---|---|---|
| १ | केंद्रशासनाच्या हिस्सा ८०% | रु. ६३.२२ कोटी |
| २ | राज्यशासनाच्या हिस्सा १०% | रु. ७.९० कोटी |
| ३ | मनपा हिस्सा १०% | रु. ७.९० कोटी |
| ४ | असे एकुण मंजुर किंमत रु. | ७९.०२ कोटी |

मंजुर योजनेमध्ये प्रामुख्याने खालील उपांगे होते.

१) उद्भव - वारणा नदी.

२) समडोळी येथे वारणा नदीवर ९ मी. व्यासाचे जॅकवेल व पंप हाऊस बांधणे व तेथे ४४३ एचपी चे ५ नग पंपिंग मशिनरी बसविणे.

... २ ...

३) सदर जॅकवेल ते माळबंगला सांगली येथील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत १४०० एमएम व्यासाचे सुमारे १३५०० मीटर लांबीचे दाबनलिका (रायझींग मेन ) टाकणे.

४) कृष्णा नदीवर पाईपलाईन टाकणेसाठी ट्रस ब्रिड्ज बांधणे.

५) सांगली व कुपवाडसाठी २२ व २१ एमएलडी क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधणे.

६) माळबंगला ते हिराबाग ८००एमएम व्यासाचे डीआय गुरुत्वनलिका टाकणे

७) कुपवाड वानसलेसवाडी येथे वेगवेगळया ८ ठिकाणी उंच टाक्या बांधणे व त्यास लागणारी गुरुत्व नलिका टाकणे.

८) कुपवाड व वानलेसवाडी येथे सुमारे १०६ कि.मी. लांबीचे वितरण व्यवस्था टाकणे.

वरीलप्रमाणे मंजुर योजनेचा अंमलबजाणीसाठी माहे जानेवारी २००८ मध्ये केंद्र व राज्यशासनाकडून अनुदानाच्या पहिल्या हप्त्यापोटी रु. १४.७८ कोटी निधी उपलब्ध झाला होता.

मंजुरीनंतर निधी मिळण्यामध्ये उशिरा झाल्याने योजनेचा अपेक्षित खर्चामध्ये वाढ होवून त्यावेळच्या अंदाजपत्रकानुसार योजनेचे किंमत रु. १३२ कोटी इतकी झाली होती. योजना पूर्ण करणेसाठी येणारा वाढीव खर्चापोटी अनुदान केंद्रशासनाकडून मिळणार नसलेबाबत केंद्रशासनाचे निर्देश आहेत.

सांगली मिरज कुपवाड शहर मनपा मध्ये समाविष्ठ कुपवाड व वानलेसवाडी शहरांना त्यावेळी त्यांचे स्वतःचे पाणी पुरवठा योजना नसल्याने एमआयडीसीकडून पाणी घेवून तेथील नागरिकांना मनपामार्फत पुरविणेत येत आहे. त्याचा खर्च वार्षिक सुमारे रु. ७० ते रु. ८० लक्ष इतका आहे.

योजनेचा वर उल्लेख केल्याप्रमाणे अपेक्षित खर्च वाढल्याने समडोळी (वारणानदी) वरुन कामे सुरु केल्यास कुपवाड शहरात उपलब्ध निधीमध्ये कोणतेही काम करता येणार नव्हते. त्यामुळे मंजुर योजनेतील कामाचे प्राधान्यक्रम ठरविणेसाठी तांत्रिकरित्या तज्ञ सल्लागाराकडून मंजुर योजेनेतील उपांगामध्ये तांत्रिक बदल करुन प्रस्ताव मंजुरीसाठी महासभेपुढे सादर करणेत आला आहे.

मुळ मंजुर योजना व तांत्रिक बदल करुन सादर केलेल्या योजनेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(रु. कोटीमध्ये )

| अ.क्र. | उपांगे | मंजुर किंमत | तांत्रिक बदलानंतर प्रस्तावित केलेल्या उपांगांची किंमत | तांत्रिक बदलाचे तपशिल | कामाची सध्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | वारणा नदीवर जॅकवेल व पंप हाऊस बांधणे, त्यावर पंपिंग मशिनरी बांधणे, ॲप्रोच ब्रिज बांधणे इत्यादी कामे | रु.७.७३ | ० | काम दुसऱ्या टप्प्यात घेणेचे ठरले आहे. | -- |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| २ | अशुध्द पाण्याची दाबनलिका, लाबी १३५०० मी. | रु.३३.८७ | रु. ७.३५ | पहिल्या टप्प्यात केवळ ३५०० मी. ची कृष्णा नदीवरील जॅकवेल पर्यंत दाबनलिका टाकणे. | ३५०० मी. काम पूर्ण पाणी पुरवठा सुरु. |
| ३ | माळबंगलापासुन हिराबाग जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत ग्रॅव्हीटी मे न टाकणे. | रु.४.०४ | रु. ५.०४ | - | ९०% काम पूर्ण |
| ४ | कृष्णा नदीवरील ट्रस ब्रिज बांधणे | रु ०.९७ | | - | दुस-या टप्प्यात घेणे. |
| ५ | माळबंगला येथे एकत्रित ७० एमएलडी क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधणे. | रु.५.०५ | रु. २०.३६ | अत्याधुनिक पध्दतीचे जलशुध्दीकरण केंद्र वाढीव क्षमतेचे बांधणेचे प्रस्तावित आहे. | ४०% काम पूर्ण |
| ७ | सांगली शहरात प्रत्येकी १५ लक्ष लि. क्षमतेचे ४ उंच टाक्या बांधणे | तरतुद नाही. | रु. २.८८ | शहराच्या सन २०२५ च्या मागणीनुसार विस्ताराप्रमाणे या टाक्या बांधणे आवश्यक आहे म्हणून या कामाचा समावेश करणेत आले आहे. | माहे मे २०११ मध्ये कामाचे आदेश देणेत आले आहे. काम प्रगतीपथावर आहेत. मार्च २०१४ पर्यंत काम पूर्ण होईल |
| | अस्तित्वातील उंच टाक्यांची दुरुस्ती | तरतुद नाही. | रु. २.९५ | अस्तित्वातील टाक्यांचे येथून पुढेही वापरावे लागणार असल्याने त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. | ३१डिसेंबर २०१३ पर्यंत कामे पूर्ण होतील. |
| ९ | माळबंगला येथील अस्तित्वातील ३६ दलली क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती | तरतुद नाही | रु.२.०९ | माळबंगला येथील जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. दुरुस्तीनंतर सदर जलशुध्दीकरण केंद्र पुढे वापरता येवू शकते. म्हणून दुरुस्तीसाठी तरतुद क रणेत आली आहे. | मार्च २०१४ पर्यंत काम पूर्ण होईल. |

वरील प्रमाणे तांत्रिक बदलानुसार काम पूर्ण झाल्यावर गरज भासल्यास वारणा उद्भवाशी संबंधित उर्वरीत कामे भाग -२ योजनेमध्ये समावेश करून त्याप्रमाणे सविस्तर प्रकल्प अहवाल मा.शासनाकडे मंजूरीसाठी सादर करणेस मा.महासभेने ठराव क्र.१९३ दि.१०/१०/२०११ ने ठराव पारित केला आहे.

वरील तांत्रिक बदलाच्या प्रस्तावास महासभेचे मंजुरीनंतर केंद्र शासनाकडील Ministry of Urban Development Dept. कडील CPHEEO नवी दिल्ली यांनी दिनांक २३/११/२०११ रोजीच्या बैठकीत मान्य करुन राज्यशासनाच्या एसएलएससीकडे पाठविले होते. सदर प्रस्ताव एसएलएससीच्या दिनांक ३१/०१/२०१२ च्या बैठकीत अंतिमत: मान्यता देणेत आली आहे. यातील बहुतांशी कामे पूर्ण होत आली आहेत.

सध्या तांत्रिक बदलानुसार कामे पूर्णत्वाच्या स्थितीत आहेत. तांत्रिक बदलानुसार सध्या पूर्ण झालेले व अपूर्ण कामे पूर्ण करणेसाठी एकुण रु. १२८ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. मार्च २०१४ पर्यंत सर्व कामे पूर्ण होतील. तांत्रिक बदलानुसार पूर्ण झालेल्या उपांगामधून कृष्णानदी उद्भवावरुन सांगली व कुपवाड शहराला सध्या पाणी पुरवठा करणेत येत आहे.

वरील दिनांक १०/१२/२०१३ रोजीच्या बैठकीच्या वेळी दिलेल्या सुचने प्रमाणे मूळ योजनेतील उर्वरीत कामाची प्राथमिक अंदाजानुसार किंमत र.रू.६९.८४ कोटी इतकी होत आहे.

वरील योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाकडून अनुदान मिळणेसाठी ३ पर्याय आहेत. त्याचे आर्थिक आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

१. केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT कार्यक्रम

| योजनेची किंमत | केंद्र शासनाकडून अनुदान ८०% | राज्य शासनाकडून अनुदान १०% | मनपा हिस्सा १०% |
|---|---|---|---|
| रू.६९.८४ कोटी | रू.५५.८८ कोटी | रू.६.९८ कोटी | रू.६.९८ कोटी |

२. राज्य शासनाकडील सुजल निर्मल अभियान

| योजनेची किंमत | राज्य शासनाकडून अनुदान ७०% | कर्ज २०% | मनपा हिस्सा १०% |
|---|---|---|---|
| रू.६९.८४ कोटी | रू.४८.८८ कोटी | रू.१३.८६ कोटी | रू.६.९८ कोटी |

३. राज्य शासनाकडील नगरोत्थान अभियान

| योजनेची किंमत | राज्य शासनाकडून अनुदान ५०% | मनपा हिस्सा ५०% |
|---|---|---|
| रू.६९.८४ कोटी | रू.३४.९२ कोटी | रू.३४.९२ कोटी |

वरील पर्याया पैकी पर्याय क्र.१ केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT कार्यक्रमा अंतर्गत सदरची योजना प्रस्तावित करणे या सभेस उचित वाटते.

सदर कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही सक्षम सरकारी यंत्रणा असलेने आणि योजनेस तांत्रिक मंजूरी त्यांचेकडून घ्यावी लागणार असल्याने सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी म.जी.प्रा.चे नियुक्तीस तसेच सविस्तर प्रकल्प अहवालाप्रमाणे येणारे योजनेचे खर्चाचे किंमतीस विषयपत्रानुसार ही सभा मान्यता देते आहे. प्रकल्प अहवालानुसार योजना पूर्ण करणेसाठी आवश्यक असणारा निधी प्राप्त होणेसाठी केंद्र शासनाकडे अलहिदा प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

कार्यकारी अभियंता

महापालिका सूचक, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका — मा. किशोर जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. राजेश नाईक

सौ. कांचन कांबळे
महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २८६

विषय क्रमांक :- १२

---

सोबतचे उपायुक्त (ग्रंथपाल) यांचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय मिरज येथे सौ.सावित्रीबाई फुले वाचनालय कार्यरत आहे. सद्यस्थितीत वाचनालयाची जागा अपुरी पडत आहे. यासाठी सदरचे वाचनालय बालगंधर्व नाट्यगृहाच्या आर्ट गॅलरीत स्थलांतर केल्यास सदरची गॅलरी वापरात येणार असून, विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज अभ्यासिकाही तयार करता येईल. यासाठी सौ.सावित्रीबाई फुले वाचनालय बालगंधर्व नाट्यगृहामधील आर्ट गॅलरी मध्ये स्थलांतरीत करणेकामी मान्यता मिळणेसाठी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती सदरचा प्रस्ताव ही सभा नामंजूर करीत असून, सदरचे वाचनालय आहे त्याच ठिकाणी ठेवणेत यावे असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

ग्रंथपाल

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २८७

विषय क्रमांक :- १३

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड या तिन्ही नगरपरिषदांची मिळून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सन १९९८ मध्ये अस्तित्वात आली. महानगरपालिका क्षेत्रामध्ये उभारणेत येणाऱ्या होर्डिग्ज् (जाहिरात फलक) यासाठी मालमत्ता विभागाकडून दर आकारणेत येत होते. महानगरपालिकेचे जकात हे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत होते. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यातील ड वर्ग महानगरपालिकांची जकात कर रद्द करुन त्याऐवजी स्थानिक संस्थाकर आकारणी दि.०१ मे २०१३ पासून अंमलात आली आहे. त्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती दोलायमान झाली असून, महानगरपालिकेस अन्य विभागाकडून येणारे उत्पन्न अत्यल्प असल्याने आणि बाजारातील भाववाढ विचारात घेता उत्पन्न वाढीच्या दृष्टीने दरामध्ये सुधारणा करणे या सभेस उचित वाटते. त्यानुसार महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये उभारणेत येणारे होर्डिग्ज् (जाहिरात फलक) सुधारीत दरास खालील प्रमाणे मान्यता देत आहे.

**खाजगी जागेतील व महानगरपालिकेच्या जागेतील होर्डिग्ज् (जाहिरात फलक)**

| अ. क्र. | घटक | सद्याचे शुल्क | प्रस्तावित शुल्क | सुधारीत शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | अर्जाची किंमत (नविन/नुतनीकरण ) | ५/- | १००/- | १००/- |
| २. | वार्षिक जाहिरात कर | १२/- प्रति चौ.फुट | २०/- प्रति चौ.फुट | २५/- प्रति चौ.फुट |
| ३. | वार्षिक परवाना शुल्क | आकारत नाही | १०००/- प्रति होर्डिंग | १०००/- प्रति होर्डिंग |
| ४. | सुरक्षा अनामत | आकारत नाही | १०००/- प्रति होर्डिंग | १०००/- प्रति होर्डिंग |
| ५. | नुतनीकरण शुल्क | आकारत नाही | १०००/- प्रति होर्डिंग | १०००/- प्रति होर्डिंग |

**खाजगी जागेतील व महानगरपालिकेच्या जागेतील इलेक्ट्रॉनिक होर्डिग्ज् (जाहिरात फलक)**

| अ. क्र. | घटक | सद्याचे शुल्क | प्रस्तावित शुल्क | सुधारीत शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | अर्जाची किंमत (नविन/नुतनीकरण ) | ५/- | १००/- | १००/- |
| २. | वार्षिक जाहिरात कर | १२/- प्रति चौ.फुट | ४०/- प्रति चौ.फुट | ५०/- प्रति चौ.फुट |
| ३. | वार्षिक परवाना शुल्क | आकारत नाही | १०००/- प्रति होर्डिंग | १०००/- प्रति होर्डिंग |
| ४. | सुरक्षा अनामत | आकारत नाही | १०००/- प्रति होर्डिंग | १०००/- प्रति होर्डिंग |
| ५. | नुतनीकरण शुल्क | आकारत नाही | १०००/- प्रति होर्डिंग | १०००/- प्रति होर्डिंग |

... २ ...

**१ ते ७ दिवस कालावधीचे जाहिरात फलक**

| अ. क्र. | घटक | सद्याचे शुल्क | प्रस्तावित शुल्क | सुधारीत शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | अर्जाची किंमत (नविन/नुतनीकरण ) | ५/- | १००/- | १०/- |
| २. | जाहिरात कर | १/- प्रति चौ.फुट | १०/- प्रति चौ.फुट (१ ते ७ दिवसांसाठी) | २/- प्रति चौ.फुट |
| ३. | तात्पुरते परवाना शुल्क | आकारत नाही | १००/- प्रति जाहिरात फलक | ५०/- प्रति जाहिरात फलक |
| ४. | सुरक्षा अनामत | आकारत नाही | १००/- प्रति जाहिरात फलक | १००/- प्रति जाहिरात फलक |
| ५. | नुतनीकरण शुल्क | आकारत नाही | १००/- प्रति जाहिरात फलक | १००/- प्रति जाहिरात फलक |

**१ ते ७ दिवस कालावधीचे इलेक्ट्रॉनिक जाहिरात फलक**

| अ. क्र. | घटक | सद्याचे शुल्क | प्रस्तावित शुल्क | सुधारीत शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | अर्जाची किंमत (नविन/नुतनीकरण ) | ५/- | १००/- | १०/- |
| २. | जाहिरात कर | १/- प्रति चौ.फुट | २०/- प्रति चौ.फुट (१ ते ७ दिवसांसाठी) | २०/- प्रति चौ.फुट |
| ३. | तात्पुरते परवाना शुल्क | आकारत नाही | १००/- प्रति जाहिरात फलक | ५०/- प्रति जाहिरात फलक |
| ४. | सुरक्षा अनामत | आकारत नाही | १००/- प्रति जाहिरात फलक | १००/- प्रति जाहिरात फलक |
| ५. | नुतनीकरण शुल्क | आकारत नाही | १००/- प्रति जाहिरात फलक | १००/- प्रति जाहिरात फलक |

वरील प्रमाणे प्रशासनाने सुधारीत दराची नोंद घेवून, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापासून आकारणी करणेत यावी. महासभेने निश्चित केलेल्या महापालिका मालकीच्या जागेतील फलकासाठी महासभेने निश्चित केलेनुसार जागा भाडे भरणे आवश्यक राहील तसेच, वरील दरामध्ये प्रतिवर्षी १०% दरवाढ करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.किशोर जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.रा.वि.शाईक

२५ कांचन ल ३ ?

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २८८

विषय क्रमांक :- १४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील लहान दुकान गाळे,व्यापारी संकुलातील दुकान गाळे आणि खोकी हस्तांतरण करणेकामी महासभा ठराव क्र.१४२ दि.१९/१०/२००२ अन्वये हस्तांतरण फी निश्चित करणेत आली होती. त्यानुसार फी आकारणेत येत आहे. सदरची फी निश्चित करुन जवळ-जवळ ११ वर्षाचा कालावधी लोटला आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यातील ड वर्ग महानगरपालिकांची जकात कर रद्द करुन त्याऐवजी स्थानिक संस्थाकर आकारणी दि.०१ मे २०१३ पासून अंमलात आली आहे. त्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती दोलायमान झाली असून, महानगरपालिकेस अन्य विभागाकडून येणारे उत्पन्न अत्यल्प असल्याने आणि बाजारातील भाववाढ विचारात घेता उत्पन्न वाढीच्या दृष्टीने दरामध्ये सुधारणा करणे या सभेस उचित वाटते. शुल्क वाढीच्या नैसर्गिक वाढीचा दर विचारात घेतला असता, महानगरपालिकेच्या उत्पन्ना मध्ये भर पडण्याच्या दृष्टीने गाळे हस्तांतरण करणेकामी सुधारीत दर निश्चित करुन नविन आर्थिक वर्षापासून आकारणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ. क्र. | तपशिल | सद्याचे फी | प्रस्तावित फी | सुधारीत फी |
|---|---|---|---|---|
| १. | लहान दुकान गाळा | ३०,०००/- | ५५,०००/- | ७५,०००/- |
| २. | व्यापारी संकुलातील दुकान गाळा | ५०,०००/- | ९०,०००/- | १,५०,०००/- |
| ३. | खोक्यासाठी | १०,०००/- | १८,०००/- | २०,०००/- |
| ४. | वारसांना खोकी हस्तांतरण | २,०००/- | ६,५००/- | २,०००/- |
| ५. | वारसांना दुकानगाळे हस्तांतरण | ५,०००/- | १६,०००/- | ५,०००/- |

वरील प्रमाणे सुधारीत फी ची नोंद घेवून प्रशासनाने योग्यती कार्यवाही विनाविलंब ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा.कि.बा.आमदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.राजेश नाईक

श्री कांचन कांबळे
महापौर,

मा.ल.मत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८**  दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २८९

विषय क्रमांक :- १५

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर जाहिरात प्रसिद्ध करणेकामी एकूण ८६ ठिकाणे निश्चित करणेस आणि सदर जागांवर २०X२० फुट या मापाचे समान जाहिरात फलक प्रसिद्ध करणेकरीता एका जाहिरात बोर्डासाठी र.रु.६,९००/- इतके जागा भाडे निश्चित करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(क) अन्वये धोरणात्मक मान्यता मिळणेबाबत विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. प्रस्तुत कामी ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यातील ड वर्ग महानगरपालिकांची जकात कर रद्द करुन त्याऐवजी स्थानिक संस्थाकर आकारणी दि.०१ मे २०१३ पासून अंमलात आली आहे. त्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती दोलायमान झाली असून, महानगरपालिकेस अन्य विभागाकडून येणारे उत्पन्न अत्यल्प असल्याने आणि बाजारातील भाववाढ विचारात घेता उत्पन्न वाढीच्या दृष्टीने दरामध्ये सुधारणा करणे या सभेस उचित वाटते. सबब, महानगरपालिकेच्या मालकीच्या ८६ जागा निश्चित करणेस तसेच, सदर जागांवर २० फुट x २०फुट या मापांची जाहिरात प्रसिद्ध करणेस बाजारभावातील सर्वोच्च मुल्यांकनानुसार एका बोर्डासाठी र.रु.१०,०००/- (प्रत्येकी) इतके जागा भाडे निश्चित करुन जाहिरात प्रसिद्ध करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(क) अन्वये विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. तसेच, प्रस्तुत कामी जाहिर निविदा प्रसिद्ध करुन एतद् विषयीची पुढील कार्यवाही संबंधीत अखत्यारीचे मान्यतेने ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा.किशोर.जामदार  ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. शा. वि. नाईक

कांचन उ कांबळे
महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २९०

विषय क्रमांक :- १६

सोबतचे उपायुक्त (जलवि) यांचे दि.०७/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहरांचे भुयारी गटार योजनांचे प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानातंर्गत मा.महाराष्ट्र शासनाकडे सन २०१० मध्ये मान्यतेसाठी सादर करणेत आले होते. कुपवाड शहराच्या भुयारी गटार योजनेच्या प्रकल्पाची सन २०१०-११ च्या दरसुचीने किंमत रू.९६.७६ कोटी इतकी होती.

महाराष्ट्र शासनाच्या प्रकल्प मान्यता व सनियत्रंण समितीच्या दि.०१/१०/२०११ च्या बैठकीत कुपवाड शहरांच्या प्रकल्पावर विचार होवुन समितीने पिण्याच्या पाण्याची योजना पूर्ण झाल्यानंतर भुयारी गटार योजनेचा विचार होईल असे सुचित केले. महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या UIDSSMT कार्यक्रमांअतर्गत कुपवाड शहरासाठी पिण्याच्या पाण्याची योजना राबविलेली आहे. सद्यस्थितीत योजनेचे काम पूर्णत्वावर येवुन योजना कार्यान्वित झालेली आहे. यामुळे या ठिकाणी भुयारी गटार योजनेची आवश्यकता आहे.

महापालिकेच्या सांगली व मिरज शहरात भुयारी गटार योजना अस्तित्वात असलेने तसेच विस्तारीत भागासाठीच्या योजनांची कामे सुरू असलेने कुपवाड शहरातील नागरीकांची भुयारी गटार योजनेची मागणी तीव्रतेने होत आहे. यासाठी सादर प्रकल्प अहवाल म.जी.प्रा. कडून चालू दरसुचीने सुधारीत करून शासनास मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत केंद्र शासनाचा UIDSSMT कार्यक्रम व महाराष्ट्र शासनाचा सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान हा कार्यक्रम सुरू असुन या पैकी एका कार्यक्रमा अंतर्गत सदर योजनेचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर करावा लागणार आहे. दोन्ही ही कार्यक्रमाचा वित्तीय आकृतीबंध खालील प्रमाणे आहे.

UIDSSMT :-

| | | |
|---|---|---|
| क्रेंद्र शासन :- ८०% | महाराष्ट्र शासन १०% | मनपा हिसा १०% |

सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान :-

| | |
|---|---|
| महाराष्ट्र शासन ५०% | मनपा हिसा ५०% |

महापालिकेच्या दृष्टीने UIDSSMT चा वित्तीय आकृतीबंध श्रेयस्कर आहे. तथापी, या कार्यक्रमाचे मुदत मार्च २०१४ अखेर संपत आहे. तद्नंतर या योजने अंतर्गत मंजूर प्रकल्पाचा आढावा घेवुन या कार्यक्रमाचा दुसरा टप्पा केंद्र शासन जाहिर करेल असे अपेक्षित आहे.

... २ ...

वरील बाबीचा विचार करून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या कुपवाड शहरातील नागरीकांच्या आरोग्याचा विचार करता भुयारी गटार योजना तातडीने होणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून पूर्वी सादर केलेले प्रकल्प अहवाल चालू दरसुची (सन २०१३-१४) ने सुधारीत करून घेणेत यावेत. यापूर्वी सदर योजनेचा प्रकल्प अहवाल सादर केल्यानंतर सदर परिसराची निर्माण झालेली वाढीव गरज याचा विचार करून योजना सुधारीत करणेत यावी. सन २०१३-१४ च्या चालू दरसुची नुसार होणा-या सुधारीत किंमतीचा प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून तयार करून घेवुन सत्वर मान्यता मिळणेच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाकडे केंद्र शासनाच्या लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत विकास कार्यक्रम व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान या दोनही कार्यक्रमा अंतर्गत मान्यतेसाठी सादर करणेत यावा. प्रकल्प अहवालास मान्यता मिळालेनंतर संबंधित कार्यक्रमासाठी शासनाने निर्धारीत केलेल्या सर्व शर्ती व अटी महापालिकेला बंधनकारक असतील. विषयांकीत प्रकल्प अहवाल सादर करणेस तसेच त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. कि. दा. जामदार

अनुमोदक :- मा. राजेश नाईक.

ठराव सर्वानुमते मंजुर

डॉ. कांचन कांबळे
महापौर,

कार्यकारी अभियंता (पा.पु.)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# <u>सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका</u>

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २९१

विषय क्रमांक :- ऐन.

---

प्रस्तुतचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सोबतचे उपायुक्त (सार्व.उद्याने विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सांगली येथील आमराई उद्यानातील निरुपयोगी काटेरी देवबाभळ वठलेली ४९ झाडे व वॉटर वर्क्स सांगली येथील इमारतीस व कंपौंड भिंतीस धोकादायक असणारी पाच झाडे अशा एकूण ५४ झाडांच्या जागेवर जाहिर लिलाव करणेस महासभा ठराव क्र.२१७ दि.१६-२२/११/२०१३ अन्वये मान्यता मिळाली होती. त्यानुसार जाहिर लिलाव प्रसिद्ध करुन जाहिर लिलाव करणेत आला होता. सदर लिलावामध्ये १४ लिलाव धारकांनी भाग घेतला असून, उपस्थित लिलाव धारकापैकी श्री.चंद्रकांत हणमंत नरळे यांनी र.रु.१,०५,०००/- मात्रची सर्वात जास्त बोली आल्याने सदर जाहिर लिलावाचे बोलीस विषयपत्रातील शिफारशीनुसार अंतीम तीनवार अंतरावर ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (सही) मा.किशोर जामदार

अनुमोदक :- (सही) मा.राजेश नाईक

ठराव बहुमताने मंजुर

(सही) कांचन कांबळे
महापौर,

बगीचा अधिक्षक

(सही)
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :-२९२

विषय क्रमांक :- ऐन.

---

प्रस्तुतचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सोबतचे उपायुक्त (सार्व.उद्याने विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या क्षेत्रातील महापालिका मालकीच्या रस्त्याच्या कडेची, ओपनस्पेस मधील, सार्वजनिक उद्यानातील व इतर कार्यालयाच्या परिसरातील धोकादायक वठलेली, वादळी, पाऊस वाऱ्यात उन्मळून पडलेली तसेच, विद्युत तारांना धोकादायक असणारी झाडे व झाडांच्या फांद्या उद्यान विभागाच्या सुचनेनुसार व नियंत्रणाखाली तोडून घेवून जाणेसाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक एजन्सी नियुक्त करणेसाठी जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करुन, जाहिर लिलाव करणेस महासभा ठराव क्र.१९४ दि.१९/१०/२०१३ अन्वये मान्यता मिळाली होती. त्यानुसार जाहिर लिलाव प्रसिद्ध करुन जाहिर लिलाव करणेत आला होता. सदर लिलावामध्ये २३ लिलाव धारकांनी भाग घेतला होता. उपस्थित लिलाव धारकापैकी श्री.हणमंत चंद्रकांत नरळे यांनी प्रतिटन लाकडास र.रु.४,४५०/- मात्रची सर्वात जास्त लिलावाची बोली आल्याने, सदर जाहिर लिलावाचे बोलीस विषयपत्रातील शिफारशीनुसार अंतीम तीनवार अंतरावर ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (सही) मा. कि. दा. जामदार

ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक :- (सही) मा. राजेश नाईक

(सही) सौ. कांचन उ. कांबळे
महापौर,

(सही) बगीचा आवेक्षक

(सही)
**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २९३

विषय क्रमांक :- ऐन.

---

प्रस्तुतचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सोबतचे उपायुक्त (सार्व.उद्याने विभाग) यांचे दि.०६/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या स्थलसिमेतील धोकादायक वठलेली व उन्मळून पडलेली झाडे तोडून आमराई उद्यानामध्ये एकत्रित ठेवलेले जळावू लाकूड अंदाजे ६० टन इतके आहे. तसेच, आमराई उद्यानाच्या प्रवेशद्वारामध्ये एक विलायती चिंचेचे झाड पूर्णपणे एका बाजूस झुकलेले असून ते धोकादायक झालेले आहे. सदर झाडापासून अंदाजे सर्वसाधारण लाकूड ८ टन इतके होईल. आमराई उद्यानामध्ये एकत्रित ठेवलेले जळावू लाकूड व आमराई उद्यानातील विलायती चिंचेच्या झाडाचा जागेवर जाहिर लिलाव करणे आवश्यक असून, अंदाजपत्रकानुसार दोन्ही कामगिऱ्यांचे मिळून अंदाजे रु.८६,०००/- मात्र देकार रक्कम निश्चित करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(क) अन्वये जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करुन लिलाव करणेस येणारे प्रसिद्धीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. कि.दा.आमदार

अनुमोदक :- मा. राजेश नाईक

ठराव बहुमताने मंजुर

महापौर,

कार्यवाही आवश्यक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २९४

विषय क्रमांक :- ऐन.

---

प्रस्तुतचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सोबतचे उपायुक्त (सार्व.उद्याने विभाग) यांचे दि.१३/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय मिरज शहरातील रस्त्याच्या कडेला एकूण १९० चिंचेची झाडे आहेत. सदर झाडांची चिंचफळे परिपक्व झाली असल्याने महानगरपालिकेस उत्पन्न मिळणेच्या दृष्टीने सदर चिंच झाडांच्या चिंच फळाचा जाहिर लिलाव करणे आवश्यक आहे. त्यापासून अंदाजे र.रु.८०,०००/- इतके उत्पन्न अपेक्षित आहे. मिरज शहरातील रस्त्याच्या कडेला असणाऱ्या चिंच झाडांच्या चिंच फळांचा जाहिर लिलाव करणेसाठी अंदाजे र.रु.८०,०००/- मात्र देकार रक्कम निश्चित करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(क) अन्वये जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करुन लिलाव करणेस येणारे प्रसिद्धीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.किशोर जामदार

अनुमोदक :- मा.राजेश नाईक

ठराव बहुमताने मंजुर

(सौ.कांचन कांबळे)
महापौर,

बगीचा आवेक्षक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २९५

विषय क्रमांक :- ऐन.

प्रस्तुतचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सोबतचे उपायुक्त (सार्व.उद्याने विभाग) यांचे दि.१३/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सांगली शहरातील आमराई उद्यानातील चिंच झाडांची चिंच फळे, कवठ झाडांची कवठ फळे तसेच आमराई ते कॉलेज कॉर्नर पर्यंतच्या १३,जुने वॉटर वर्क्सचे आवारातील ०२ चिंच झाडांची चिंचफळे महानगरपालिका सांगली शहरातील रि.स.नं.९९/१, २.१/२ (अडीच एकर) एकर क्षेत्रातील नैसर्गिकरित्या उगविलेले गवत आणि सि.स.नं.१५५/ब सांगली येथील २० ते २५ गुंठे क्षेत्रातील नैसर्गिकरित्या उगविलेल्या गवताच्या जाहिर लिलाव करणेस खालील तक्त्यामध्ये नमुद केलेल्या देकार रक्कम निश्चित करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(क) अन्वये जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करुन लिलाव करणेस येणारे प्रसिद्धीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | लिलाव तपशील | महासभेने निश्चित केलेली देकार र.रु. |
|---|---|---|
| १. | आमराईतील कवठ झाडांची कवठ फळे | १,२००/- |
| २. | आमराईतील चिंच झाडांची चिंच फळे | १०,०००/- |
| ३. | आमराई ते कॉलेज कॉर्नर रस्त्यावरील चिंच झाडांची चिंच फळे | ८,०००/- |
| ४. | रि.स.नं.९९/१ सांगली येथील नैसर्गिकरित्या उगविलेल्या २.१/२ क्षेत्रातील गवत | २५,०००/- |
| ५. | सि.स.नं.११५/ब सांगली येथील नैसर्गिकरित्या उगविलेल्या २० ते २५ गुंठे क्षेत्रातील गवत | ६,०००/- |

सूचक :- मा.नगरसेवक (signature) मा.नि.दा.आमराई(?)

ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक :- (signature) मा.राजेश नाईक

बगीच्या आवेक्षक

श्री कांचन(?) कांबळे(?)
महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २९६

विषय क्रमांक :- ऐन.

प्रस्तुतचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सोबतचे उपायुक्त (सार्व.उद्याने विभाग) यांचे दि.१४/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय मिरज येथील कृष्णाघाट येथे गट नं.५९३/२ येथे एक एकर जमिनीचे क्षेत्र आहे. सदर जमिनीमध्ये नैसर्गिकरित्या उगविलेल्या गवतांचा वार्षिक लिलाव केला जातो. त्यानुसार सन २०१४-१५ व सन २०१६-१४ या तीन वर्षासाठी जाहिर लिलाव केल्यास महानगरपालिकेस अंदाजे र.रु.२७,०००/- इतके उत्पन्न अपेक्षित आहे. सबब, महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय मिरज येथील गट नं.५९३/२ येथील जमिनीमध्ये उगविलेल्या नैसर्गिक गवताचा सन २०१४-१५ ते सन २०१६-१७ या तीन वर्षासाठी त्रैवार्षिक गवत लिलाव करणेसाठी र.रु.२७,०००/- इतकी देकार रक्कम निश्चित करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(क) अन्वये जाहिर लिलाव नोटीस प्रसिध्द करुन लिलाव करणेस येणारे प्रसिद्धीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. र्कि. दा. जामदार

अनुमोदक :- मा. राजेश नाईक

ठराव बहुमताने मंजुर

महापौर,

कार्यवाही आवश्यक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २९७

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय, मिरज कडील मिरज हायस्कूल मिरजचे पटांगण माहे सप्टेंबर / आक्टोंबर २०१४ या कालावधी मध्ये माझ्या मुलीचा विवाह सोहळा असल्याने, विवाह सोहळ्यासाठी मिरज हायस्कूल मिरजचे पटांगण उपलब्ध करुन मिळणेची श्री.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान यांनी मागणी केली आहे. त्यासी ही सभा सहमती दर्शवित असून, श्री.बागवान यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांचे मुलीच्या विवाह सोहळा निश्चित होईल त्या दिनांकास त्यांचे मागणी प्रमाणे नियमानुसार मिरज कडील मिरज हायस्कूल मिरजचे पटांगण उपलब्ध करुन देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]

ठराव बहुमताने मंजुर

[signature]
महापौर,

मा.व्यवस्थापक

[signature]
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०८** दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २९८

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य गौतम संभाजी पवार यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील तीनही शहरामधील काही जागा भाड्याने देणेत आलेल्या आहेत याबाबत आज काय परिस्थितो आहे याची कल्पना व माहिती कोणा सदस्य व पदाधिकारी यांना माहिती नाही. सदर जागा किती कालावधीसाठी भाड्याने दिलेल्या आहेत? त्याचे भाडे काय? यापासून किती रुपयांचे उत्पन्न महापालिकेस प्राप्त झाले? याची माहिती महासभेस होणे आवश्यक आहे. ज्या जागा या अल्यल्प दराने भाड्याने दिल्या असल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. सदरकामी महासभेमध्ये सविस्तर चर्चा होवून धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. सदरचा प्रस्ताव हा महापालिकेच्या आर्थिक हिताशी संबंधीत असलेने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा.

सूचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन उ.कांबळे

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ | दिनांक :- १५/०२/२०१४

ठराव क्रमांक :- २९९

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य गौतम संभाजी पवार यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका शहरातील तीन ही शहरात अगदी मोक्याच्या ठिकाणी महानगरपालिकेच्या मालकीच्या अनेक मालमत्ता आहेत. ज्यांची किंमत आज बाजारभावामध्ये कोट्यावधी रुपये आहे. महानगरपालिका क्षेत्रातील अनेक मालमत्ता अद्यापही महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या नाहीत. सदर मालमत्तांवर महानगरपालिकेचे नाव नोंद करण्यात आले नसल्याने, त्यांचा गैरवापर होवून त्यावर अतिक्रमण होवून त्या महानगरपालिकेच्या ताब्यातून जाण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे कोटयावधी रुपये नुकसान होणार आहे. सदर मालमत्तांचे संरक्षण व जतन करण्याबाबत यापूर्वीच्या धोरणात काळानुरुप आवश्यक ते बदल करणे, मालमत्ता शोधून काढणे या संदर्भातील सर्व कायदेशिर बाबींची पूर्तता विहित मुदतीत करणे अत्यंत गरजेचे आहे आणि ही जबाबदारी सर्वस्वी महानगरपालिका प्रशासनाची आहे. महानगरपालिकेचे हित जपण्यासाठी या विषयावर साधक-बाधक चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. सदरचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या आर्थिक हिताशी निकडीत असलेने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,